‘मधुक्रांती-२०२०’



‘एशियन एलिफण्ट हनी बी प्रोजेक्ट’

# कणभर मधमाशीची मणभर हत्तीपुढे सरशी!

## सृष्टिकेंद्री कृषी संवर्धनाचा लक्षवेधी प्रयोग

- बहरलेल्या शेताला मधमाश्यांचं ‘जैविक कुंपण’
- मध आणि इतर उपयुक्त घटकांपासून अर्थलाभ
- अधिवासातले हत्ती, वावरातलं पीक आणि माणूसही सुखरूप
- परागीभवनातून वाढीव तसंच दर्जेदार शेतमालाचं उत्पादन

तसं बघायला गेल्यावर, मधमाशी हत्तीच्या अंगावर बसली तर अगदी जवळून बघितल्याशिवाय ती दिसणारही नाही! मात्र या मधमाशीला घाबरून हत्ती पिकापासून दूर जातात असं म्हटलं तर आश्चर्यच वाटेल!

-पण हा प्रयोग **डॉ. युवराज कागिनकर** यांच्या मार्गदर्शनाखाली राबवलेल्या एका प्रकल्पाद्वारे यशस्वी ठरला आहे. शेतकऱ्यांचं उभं पीक उद्ध्वस्त करणारे रानटी हत्ती या मधमाश्यांच्या धाकाने शेताकडे फिरकत नाहीत, असं प्रयोगान्ती सिद्ध झालं आहे. हा प्रकल्प ‘एशियन एलिफण्ट हनी बी प्रोजेक्ट’ या नावाने ओळखला जात असून, याद्वारे मधमाशी पालन- संवर्धन आणि पीकसंरक्षण असा दुहेरी उद्देश साध्य झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात आणि पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्ह्यातील शेतांमध्ये हा प्रकल्प प्रारंभी राबविण्यात आला.



डॉ. युवराज कागिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेला ‘एशियन एलिफण्ट हनी बी प्रोजेक्ट’ सर्वतोपरी उपयुक्त ठरत आहे.

रानटी हत्तींमुळे होणाऱ्या पीकहानीच्या संदर्भात दोन वर्षांपूर्वी आमदार नीतेश राणे यांची तिलारी खोऱ्यातल्या शेतकऱ्यांनी भेट घेतली होती. दोन सप्टेंबर २०१८ रोजी डॉ. युवराज कागिनकर यांच्या टीमने तिलारीमध्ये रानटी हत्तींच्या मार्गामध्ये मधमाश्यांच्या चौदा पेट्या बसवल्या. या प्रयोगाला यश येऊ लागल्याचे दिसताच आवश्यकतेनुसार आणखी दोन-तीनशे पेट्या बसवण्यात आल्या. मधमाश्यांचे अस्तित्व जाणवल्याने हत्तींनी आपला मार्ग बदलला आणि शेतकऱ्यांची पिके वाचली.

डॉ. युवराज कागिनकर हे **‘मायव्हेट चॅरिटेबल ट्रस्ट ॲण्ड रिसर्च’** या संस्थेचे प्रमुख आहेत. दक्षिण आफ्रिका तसेच केनियामध्ये हा प्रयोग लाभदायी ठरल्याची माहिती मिळाल्यावर, त्यांनी भारतात प्रामुख्याने जंगल विभागाला लागून असलेल्या लहान पाड्यांवरील तसेच

या 'मल्टि-डायमेन्शनल कॉन्फ्लिक्ट मिशन टूल'च्या उपयोगाने; म्हणजेच मधुमक्षिकांच्या कुंपणामुळे हत्तींचे पिकांवरील हल्ले कमी होतील. ज्यामुळे शेतकरी, शेतमजूरही सुरक्षित राहतील. पिकांचे परागीभवन साध्य होईल. मध आणि मधमाशीजन्य उत्पादनांच्या विक्रीतून अतिरिक्त उत्पन्न मिळेल. हत्ती व माणसांच्या दरम्यान संघर्षमय परिस्थिती निर्माण होणार नाही. सृष्टीतील नैसर्गिक प्रेरणा परस्परांना छेदून जाण्याचे प्रमाण घटणार असल्याने, सजीव- निसर्ग यांमध्ये संतुलन साधेल.




खोऱ्यांमधील वनशेतीत हा प्रयोग राबवला.

मधमाश्यांच्या शरीरातील ग्रंथींमधून स्रवणारा फेरोमोन (संकेत-रसायन गंध) हत्तींना दीड-दोन किलोमीटरवरूनही जाणवतो, कारण त्यांची घ्राणेंद्रिये- गंधसंवेदना अतिशय तीव्र असते. मधमाश्यांचे अस्तित्व दुरुनच जाणवल्याने हत्ती आपला निर्धारित मार्ग बदलतात. ही वाट पीकक्षेत्राच्या बाहेरची असल्याने साहजिकच शेतीतील नुकसान टळते. या प्रकल्पाचे म्हणजेच 'एशियन एलिफण्ट हनी बी प्रोजेक्ट'चे अनेक उपयुक्त लाभ आहेत. यात भारतीय एपिस सिरिना इंडिका मधमाश्यांचे पालन- संवर्धन जसे केंद्रस्थानी आहे; तसेच रानटी हत्तींचे त्यांच्या अधिवासातील जतनही अभिप्रेत आहे. अशा प्रयोगामुळे हत्तींच्या धुमाकुळाद्वारे पिकाची तसेच प्रसंगी होणारी मनुष्यहानी देखील टाळता येईल. मधपेट्यांचे 'जैविक कुंपण' घालून राबवलेल्या या प्रकल्पाच्या अनुषंगाने केलेल्या मधमाशी पालनातून अनेक प्रकारे लाभ मिळू शकेल. मध त्याचप्रमाणे आनुषंगिक पदार्थांद्वारे मिळणारा हमखास अर्थलाभ, पिकांचे परागीभवन, त्याद्वारे भरघोस- दर्जेदार कृषी उत्पादन आणि पर्यावरण संवर्धन यातून साध्य होऊ शकेल. **(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■